महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्रमांकः तंशिविकापु/विवि/पदविका प्रवेश/अभिप्राय/२०२३/ 296 दिनांक : १७.०१.२०२३

17 JAN 2023

**परिपत्रकः**

प्रति,
प्राचार्य,
शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित,
अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम व थेट द्वितीय वर्ष अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी विकसित करुन घेण्यात आलेल्या ऑनलाइन प्रणालीच्या उपयुक्ततेबाबत अभिप्राय..**

संदर्भ : तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र जा.क्र. ०३/तंशिसं/आयटी सेल/अभिप्राय/२०२२-२३/०७ दिनांक १३.०१.२०२३.

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भिय पत्राद्वारे प्राप्त निर्देशांनुसार, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम व थेट द्वितीय वर्ष अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी संगणकीय प्रणाली विकसित करुन घेण्यात आलेली होती. सदर प्रणालीच्या उपयुक्ततेबाबत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रवेशित विद्यार्थी व संस्था यांचे कडून अभिप्राय **Feedback** घ्यावयाचे आहेत. याकरिता विद्यार्थी व संस्था त्यांचे अभिप्राय प्रथम वर्ष प्रवेशासाठ्ही **https://poly22.dte.maharashtra.gov.in** व थेट द्वितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी **https://dsd22.dte.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर लॉगीन करुन देवू शकतात.

या प्रणाली द्वारे विद्यार्थी व संस्था **Feedback Module** मध्ये विचारलेल्या विविध मुद्यांबाबत आपले मत १ ते १० या श्रेणी **(Scale)** मध्ये व भविष्यातील सुधारणांसाठी टिप्पणी/सूचना दि. ११.०१.२०२३ ते २०.०१.२०२३ य कालावधीत नोंद करु शकतात. याकरिता संबंधित संस्थेने सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांकडून अभिप्राय घ्यावयाचा आहे.

याकरिता या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांना सूचित करण्यात येते कि, उपरोक्त कालावधीत आपल्या संस्थेचा व संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांचे अभिप्राय नोंद करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करावी. याबाबत काही अडचणी उद्भवल्यास या विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.